Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- XI ISSUE- XII DECEMBER 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# शेतकऱ्यांच्या लढ्याचे नेतृत्वशील व्यक्तिमत्व : लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे

**डॉ. मनीषा जगन्नाथ झोंबाडे**
सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय मुरुड, तालुका & जिल्हा लातूर
मोबाईल -8830079432

**प्रस्तावना :**

लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे हे महान कलावंत, लहानपणापासूनच त्यांनी पाहिलेल्या, साहिलेल्या व अनुभवलेल्या दलित, श्रमिक, कष्टकरी, शेतकरी, कामगार यांचा जीवन संघर्ष त्यांच्या साहित्य निर्मितीस कारणीभूत ठरला. सर्वसामान्य लोकांच्या दु:खाची सल त्यांना नेहमी सलत होती, त्यांना स्वस्त बसू देत नव्हती. त्यामुळेच त्यांनी तळागाळातील कष्टकरी जनतेचे दु:ख आपल्या साहित्याद्वारे समाजापुढे मांडले. विशेषत: त्यांच्या शाहिरी काव्यातून स्वदेश प्रेम तसेच कष्टकरी कामगार यांच्या जीवन जाणिवांचा आक्रोश दिसतो. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे ज्यावेळी लावण्या पोवाडे गात त्यावेळी आपल्या खणखणीत आवाजाने सर्व जनतेला पेटवून टाकत असत. त्यांच्या शाहिरी काव्याची धार ही इतकी तेजदार होती की, सर्वसामान्य माणसाला देखील त्यांच्या लावणी पोवाड्याने भुरळ घातली.

**विषय प्रवेश :** वास्तविक पाहता मराठी साहित्य इतिहासामध्ये शूरवीरांच्या कहाण्या सांगणारे पोवाडे तसेच लावण्यावती स्त्रीच्या शरीराचे तिच्या शृंगाराचे उत्थान व भडक वर्णन करणाऱ्या लावण्या दिसून येतात, परंतु लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी मात्र लावणी व पोवाड्यास एक नवे वळण, नवी दिशा, नवे रूप प्राप्त करून दिली. इतके दिवस शूरवीरांच्या कहाण्या सांगणाऱ्या पोवाड्याने व सौंदर्याचे वर्णन करणाऱ्या लावणीने एक धगधगते आगळेवेगळे रूप धारण केले. या धगधगत्या रूपातच सर्वसामान्य कष्टकरी, शेतकरी, कामगार जनतेचा अस्सल चेहरामोहरा समाजाच्या निदर्शनास आणून दिला तो अण्णाभाऊ साठे यांच्या शेतकरी गीताने. भांडवलशाही विरोधात ब्र शब्दही न काढणाऱ्या शेतकरी व कष्टकऱ्यास स्व हक्काची जाणीव करून दिली ती अण्णा भाऊंच्या शाहिरी काव्याने.

शाहिरीद्वारे शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले भोग, त्यांच्या इच्छा, आकांक्षा, त्यांची होणारी कुचंबना, त्यांना हवी असणारी न्यायव्यवस्था आदी बाबी आपल्या शब्दज्वलांद्वारे जगासमोर मांडणारेअण्णा भाऊ साठे हे पहिले शाहीर आहेत. १९४९ ला संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर गव्हाणकर आणि शाहीर अमर शेख या त्रिमूर्तींनी पुढाकार घेऊन आपल्या लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून कष्टकरी जनतेच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडून त्यांना त्यांच्या स्वत्वाची जाणीव करून दिली. 'लाल बावटा' या कलापथकाचा हेतू हा केवळ मनोरंजन नसून समाज प्रबोधन करून कष्टकरी शेतकरी समाजाला न्याय मिळवून देणे, त्यांच्या हक्कासाठी रात्रंदिने लढणे हा होता.

मुळातच अण्णा भाऊ साठे हे ग्रामीण रहिवासी, त्यामुळे लहानपणापासून ते अगदी मुंबईत उदरनिर्वाहासाठी स्थायिक होईपर्यंत शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे भोग त्यांच्या मनात कुठेतरी सलत होते. बालपणापासूनच त्यांना दु:खाची झळ पोहोचलेली होती. या दु:खाच्या झळीमुळे त्यांना समाज जाणिवा स्पष्ट दिसू लागल्या. या जाणिवा त्यांनी प्रभावीपणे जगाच्या निदर्शनास आणून दिल्या. शेती,शेतकरी व त्याची सावकारामुळे झालेली वाताहत यांचा परिणाम म्हणजे त्यांनी शेतकऱ्यांसाठी गायलेली सुंदर गीते. या गीतांमधून शृंगार नाही तर सर्वसामान्य जनतेच्या, कष्टकरी शेतकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांच्या वेदनांचा आक्रोश आहे. ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथे शेतकरी मेळाव्यामध्ये अण्णा भाऊ यांनी आपल्या कलापथकाद्वारे एक कार्यक्रम सादर केला

होता. त्या कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्यांसाठी त्यांनी एक सुंदर गीत गायले होते, त्या गीतामधून साहजिकच ते शेतकऱ्यांना परिवर्तनाची दिशा देतात. त्यांनी शेतकरी गीतांमधील मराठमोळा शेतकरी पूर्वपरंपरेपासून डोक्यावर घोंगडी घेऊन, हातामध्ये काठी व जुनीपुराणी लंगोटी परिधान करून काबाडकष्ट करताना जरी दर्शविला असला तरी त्यास लढवय्या बनविण्याची , नव्या विचारांची धमक पेरण्याची, त्यांच्यामध्ये वैचारिक जागृती करण्याची उर्मी अण्णा भाऊंच्या शाहिरीमध्ये दिसून येते. अण्णा भाऊ आपल्या शेतकरी गीतामध्ये घोंगडी, काठी, लंगोटी या प्रतिकांचा वापर जाणीवपूर्वक करताना दिसतात. या प्रतिकांमधून त्यांना शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, सद्यस्थिती दर्शवायची होती. त्यांच्या मते घोंगडी, लंगोटी आणि काठी म्हणजे जुलूम,अन्याय, शोषण होय. 'हा जुलूम, अन्याय, शोषण व कुचंबना याविरुद्ध संघर्ष करण्याची तू तयारी ठेव, हजारो वर्षापासून सहन करीत आलेला अन्यायाचा प्रतिकार करावयाचा आहे तर तू निर्भीडपणे तुझ्या हक्कासाठी लढ, न्यायासाठी लढ असा संदेश अण्णा भाऊंनी शेतकऱ्यांना दिला आहे तो पुढील काव्यातून..

*"तू मराठमोळा शेतकरी घोंगडी शिरी!*
*जुनी ती काठी, जुनी लंगोटी!*
*बदल ही दुनिया सारी रे! चल बदल ही दुनिया सारी रे!*

अतिशय पोट तिडकीने अण्णा भाऊ शेतकऱ्यांना परिवर्तनाचा संदेश देतात. कारण हजारो वर्षापासून शेतकरी आपल्या कुटुंबाची परवा न करता शेती उद्योग करतो. कारण त्याला जगाची काळजी आहे. शेतात शेत पिक नाही आले तर जग कसे जगेल? जगाने पोटभर खावे यासाठी तो स्वतः उपाशी राहतो. जगाचा पोषणकर्ता शेतकरी, परंतु सरकार मात्र शेतकऱ्याच्या व्यथावेदनांकडे डोळेझाक करते. आजही शेतकऱ्यांच्या बाबतीत तीच परिस्थिती आहे. बाजारपेठमध्ये शेतकऱ्याच्या मालाला किंमत नाही. कवडी मुलाने स्वतःची पिकं विकून शेतकरी घरी परत येतात. आलेल्या तुटक्या पुंजा पैशातून तो सावकाराची कर्ज देतो, त्याच्या हाती काहीच उरत नाही. त्याने रात्रंदिवस शेतात केलेल्या कष्टाचे त्याला हवा तसा नफा मिळत नाही. याला कारणीभूत केवळ सरकारी व्यवस्थाच आहे.

१९९० नंतर जागतिकीकरणामुळे अनेक परदेशी कंपन्यांचा संपर्क भारताशी आला. परिणामी भारतातील कामगार चळवळी, सामाजिक चळवळी यांच्यामध्ये जनतेला स्वारस्य राहिले नाही त्यामुळं या चळवळी संपुष्टात येत गेल्या. शेतकरी, कामगारांच्या प्रश्नाकडे सत्ताधाऱ्यांकडून दुर्लक्ष झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावी लागले. गेल्या वीस-तीस वर्षांत लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्या च्या घटना घडत आहेत

लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी शेतकऱ्यांबाबत पंचांहत्तर वर्षापूर्वी जे भाकित सांगितले होते. ते आज खरे ठरले. आजचा शेतकरी आर्थिक संकटांनी ग्रासलेला असून तो सरकार विरुद्ध तीव्र नाराज आहे. याचे एकमेव कारण म्हणजे शेती करण्यासाठी त्याने सावकाराकडून अथवा सरकार कडून घेतलेले कर्ज. हे कर्ज त्याला व्याजा सकट परत करावे लागते. सद्यस्थिती पाहता आज बाजारपेठे मध्ये शेतकऱ्यांच्या मालाला भावच नाही. अगदी काडीमोड भावाने शेतकऱ्यांचे धन धन्य विकले जाते. शेतकऱ्याला म्हणावा तितका आर्थिक फायदा होत नाही. शेतीची मशागत करण्यापासून ते धान्य बाजारपेठेत आणेपर्यंत शेतकऱ्याचा जो खर्च झालेला असतो तो सुद्धा साधा भरून निघत नाही. बाजारपेठेत कवडीमोल भावात आपला शेतीमाल विकून शेतकरी निराश होऊन घरी परततो. कारण घरी त्याने त्याच्या कुटुंबाला आश्वासन दिलेले असते की यंदा तरी आपल्याला भरपूर पैसा मिळेल. परंतु बाजारपेठेमध्ये त्याची झालेली फसगत त्याला अगदी मरगळून टाकते. कधी कधी शेतकरी रिकाम्या हाताने घरी परत येतात. जेमतेम झालेल्या नफ्यातून इतरांचे कर्ज देता देता तो खंगून जातो. त्याला अनेक बाजूंनी आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागते.म्हणूनच अतिशय पोट तिडकीने ते शेतकरी गीतातून व्यक्त झालेले दिसतात,

*"जोंधळा नाही गहू। खातो रबरी आटा। गरिबांनी कुठं टाकाव्या खाटा।'*

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या शेतकरी गीतांद्वारे भांडवलदारांची स्वार्थी व्यापारी वृत्ती, काळाबाजार, लुबाडणूक, कामगारांचे, शेतकऱ्यांचे होणारे शोषण, वर्णवर्चस्व, दांभिकता इत्यादींनी शेतकरी, कामगारांचे होणाऱ्या हाल अपेष्ट पारदर्शकपणे मांडलेल्या आहेत. यावरून अण्णा भाऊ यांना शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांबाबत असणारी तळमळ दिसते.

अण्णा भाऊ साठे यांनी कित्येक वर्षापूर्वी शेतकऱ्यांची जी व्यथा मांडली होती ती व्यथा आजच्या शेतकऱ्यांमध्ये देखील आहे. शेतकऱ्यांच्या घालमेली, त्यातून त्यांना होणाऱ्या व्यथा वेदनांबाबत अण्णा भाऊ साठे किती जागरूक होते याविषयीं अण्णा भाऊ साठे साहित्याच्या अभ्यासक डॉ. मनीषा झोंबाडे यांनी अतिशय मार्मिकपणे लेखन केले आहे त्या लिहतात की, "जगाचा पोषणकर्ता शेतकरी परंतु सरकार मात्र शेतकऱ्याकडे डोळ झाक करते. आज ही शेतकऱ्यांच्या बाबतीत तीच परिस्थिती आहे. लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी पंच्याहत्तर वर्षापूर्वी जे भाकित सांगितले होते. ते आज खरे ठरले. आजचा शेतकरी आर्थिक संकटांनी ग्रासलेला आहे. याचे एकमेव कारण म्हणजे शेती करण्यासाठी त्याने सावकाराकडून अथवा सरकार कडून घेतलेले कर्ज. हे कर्ज त्याला व्याजासकट परत करावे लागते. सद्यस्थिती पाहता आज बाजारपेठेमध्ये शेतकऱ्यांच्या मालाला भावच नाही. अगदी काडीमोड भावाने शेतकऱ्यांचे धन धन्य विकले जाते. शेतकऱ्याला म्हणावा तितका आर्थिक फायदा होत नाही. शेतीची मशागत करण्यापासून ते धान्य बाजारपेठेत आणेपर्यंत शेतकऱ्याचा जो खर्च झालेला असतो तो सुध्दा साधा भरुन निघत नाही. बाजारपेठेत कवडीमोल भावात आपला शेती माल विकून शेतकरी निराश होऊन घरी परततो. कारण घरी त्याने त्याच्या कुटुंबाला आश्वासन दिलेले असते की, यंदा तरी आपल्याला भरपूर पैसा मिळेल. परंतु बाजारपेठेमध्ये त्याची झालेली फसगत त्याला अगदी मरगळून टाकते. कधी कधी शेतकरी रिकाम्या हाताने घरी परत येतात. जेमतेम झालेल्या नफ्यातून इतरांचे कर्ज देता देता तो खंगून जातो. त्याला अनेक बाजूंनी आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागते. पण आपली ही व्यथा सांगायची कुणाला? सरकार शेतकऱ्यांबद्दल गांभीर्यतेने विचार कधी करेल ? जगाचा पोशिंदाच जर असा उपाशी राहिला तर जग कसे जगेल ?"

वरील विवेचनात डॉ. मनीषा झोंबाडे यांनी शेतकऱ्यांच्या भयाण वास्तवतेचे दर्शन घडविताना शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आर्थिक मानसिक कुचंबना, त्यातून त्याच्या कुटुंबीयांना सोसाव्या लागणाऱ्या दुःखाच्या झळा विषयी आपले जे परखड मत मांडले आहे त्यावरून शेतकऱ्यांच्या पूर्वजांपासून ते वर्तमान काळातील पिढ्यांच्या विदारक परिस्थितींचे दर्शन घडते. तर शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर बोलताना प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी शेतकऱ्यांकडे शंभर एकर जमिनी असल्या तरी त्याची आर्थिक परिस्थिती अजूनही सुधारली नाही तर ती वरचेवर अतिशय बिकट होत असून शेतकरी हा पूर्वीसारखाच परिस्थितीशी तडजोड करून जगतो आहे असा विचार मांडला. शेतकऱ्यांच्या या बिकट, आर्थिक परिस्थितीला त्यांनी केवळ सरकारला कारणीभूत ठरविले आहे हे त्यांच्या पुढील लेखनावरून दिसून येते, "आजच्या शेतकऱ्यांकडे शंभर ते दीडशे एकर शेती जरी असली तरी तो आर्थिक विवंचनेमध्ये दिसून येतो. याचे एकमेव कारण म्हणजे शेतीची मशागत करण्यासाठी शेतीमध्ये धन धान्य पिकविण्यासाठी शेतकरी सरकार कडून कर्ज काढतो आणि करतो व्याजाच्या स्वरुपात दुप्पट तिप्पट रकमेने सरकारला भरतो. भविष्यकाळात शेतकऱ्यांवर येणाऱ्या संकटाची चाहूल अण्णा भाऊंना चाळीस वर्षापूर्वीच लागली होती त्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांना जागृत होण्यासाठी आपल्या शाहिरीद्वारे अहवाल केले"

शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक समस्यांना अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या शेतकरी गीतांमधून व्यक्त केले असले तरी आज शेतकऱ्यांच्या बाबतीत कोणतीच आर्थिक सुधारणा झालेली नाही. शेतकऱ्यांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते. शेतकऱ्यांच्या मागण्यां सरकार पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यास आहे तसे दिवस काढावे लागतात. शेतकऱ्यांची ही व्यथा सांगायची कुणाला.....? सरकार शेतकऱ्यांबद्दल गांभीर्यतेने विचार कधी करेल? जगाचा पोशिंदाच जर असा उपाशी राहिला तर जग कसे जगेल ? भविष्यकाळात शेतकऱ्यांवर येणारे अस्मानी संकट इत्यादींचा सारासार विचार करून अण्णा भाऊ यांनी शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी गीतं रचलेली दिसतात. या गीतांमधूनच अण्णा भाऊ साठे यांनी केवळ एका पिढीच्या शेतकऱ्यांनाच नव्हे तर पिढ्यानपिढ्यांना शेती करणाऱ्या शेतकरी बांधवांना जागृत केले आहे.

लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वाखाणण्यासारखा एक गुणविशेष म्हणजे त्यांनी आपल्या शाहिरीद्वारे शेतकऱ्यांचे नेतृत्व केले. आज मात्र शेतकऱ्यांसाठी नेतृत्व करणारे समाज कार्यकर्ते, नेते मंडळी फार कमी प्रमाणात दिसतात याची खंत वाटते. आज जर लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे असते तर ते

मराठमोळ्या शेतकऱ्यांसाठी, त्यांच्या हक्कासाठी, त्यांच्या कष्टाची दखल घेण्यासाठी डफावर थाप मारून नक्कीच लढले असते.

**समारोप** :

एकंदरीत अण्णा भाऊ साठे यांची शेतकरी गीतं शेतकऱ्यांच्या समस्यांचे चित्रण करणारी आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून ते आजतागायत पर्यंत शेतकऱ्यांची परिस्थिती पूर्वीसारखीच आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांवर उपाययोजना तसेच त्यांच्या हक्कासाठी निर्माण झालेल्या अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी वाड्मयातील शेतकरी गीतांचा अभ्यास करता पुढील निष्कर्ष आढळून येतात.

**निष्कर्ष**

१. शेती आणि शेतकरी हे दोन घटक जगाचे पोशिंदे असल्याने या दोन्ही घटकाकडे सरकारने सकारात्मकता दर्शविणे गरजेचे आहे हा विचार अण्णा भाऊंच्या शेतकरी गीतांमधून दिसून येते.
२. अण्णा भाऊ साठे यांची शेतकरी गीतं ही शेतकऱ्यांच्या हक्कासाठी, न्यायासाठी लढण्यास प्रेरणा देणारी ठरतात.
३. स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून ते आजतागायत पर्यंत शेतकरी हा घटक आर्थिक बाबींमध्ये उपेक्षित असून सरकारचे शेतकऱ्यांच्या समस्येकडे म्हणावे तितके लक्ष नसल्याचे दृष्टीस येते.
४. शेतकऱ्यांनी आपले जुने विचार सोडून नवविचारांची क्रांती करणे गरजेचे आहे हा अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी काव्याचा ( शेतकरी गीतांचा) मूळ गाभा आहे.

**संदर्भ** :

१. अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या, लोकनाट्यगृह प्रकाशन मुंबई, बारावी आवृत्ती २०१७.
२. डॉ. अंभोरे बाबुराव, ' अण्णा भाऊ साठे आणि अमर शेख यांची शाहिरी : एक आकलन', स्वरूप प्रकाशन,
३. डॉ. झोंबाडे मनीषा, 'परिवर्तनाची दिशा दर्शविणारे साहित्यिक : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे', सिद्धी प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २०२४.
४. प्राचार्य डॉ. कोल्हे श्रीधर, ' 'शाहिरीद्वारे शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारे साहित्यिक : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, संपा. डॉ झोंबाडे मनीषा, ' अण्णाभाऊ साठे समग्र साहित्य: एक चिंतन' (संपादित) प्रथम आवृत्ती १ ऑगस्ट २०२४